**पंतप्रधानांची भारत–ओमान बिझनेस फोरमला उपस्थिती (18 डिसेंबर  2025)**

18 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज मस्कत येथे भारत–ओमान बिझनेस फोरमला संबोधित केले. या बैठकीस ओमानचे वाणिज्य, उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री माननीय कैस अल युसुफ, ओमान चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष माननीय शेख फैसल अल रावस, भारताचे वाणिज्य व उद्योग मंत्री श्री. पीयूष गोयल आणि CII चे अध्यक्ष श्री. राजीव मेमन उपस्थित होते. या फोरममध्ये ऊर्जा, कृषी, लॉजिस्टिक्स, पायाभूत सुविधा, उत्पादन, आरोग्य, वित्तीय सेवा, हरित विकास, शिक्षण आणि कनेक्टिव्हिटी या क्षेत्रांतील दोन्ही देशांच्या प्रमुख व्यावसायिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला.

2. उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी मांडवी पासून मस्कत पर्यंतच्या भारत आणि ओमान यांच्यातील शतकानुशतके सागरी व्यापारी संबंधांचे महत्त्व अधोरेखित केले, जे आज द्विपक्षीय व्यावसायिक आदानप्रदानाला सशक्त पाया प्रदान करतात. त्यांनी नमूद केले की, 70 वर्षांचे राजनैतिक संबंध हे शतकानुशतके निर्माण झालेल्या विश्वास आणि मैत्रीचे प्रतीक आहेत. पंतप्रधानांनी व्यापार क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींना भारत–ओमान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार [CEPA] ची पूर्ण क्षमता ओळखण्याचे आवाहन केले, ज्याला त्यांनी भारत–ओमानच्या सामायिक भविष्याचा आराखडा असे म्हटले. त्यांनी अधोरेखित केले की, CEPA द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीत नवी ऊर्जा आणेल तसेच  परस्पर विकास, नवोपक्रम आणि रोजगार निर्मितीसाठी अनंत संधी निर्माण करेल.

3. मागील 11 वर्षांत भारताच्या आर्थिक यशाबद्दल बोलताना पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी म्हणाले की, पुढील पिढीच्या सुधारणा, धोरणात्मक अंदाज, सुशासन आणि उच्च गुंतवणूकदारांचा विश्वास यावर आधारित भारत जगातील3री सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे. ते पुढे म्हणाले की, जागतिक अनिश्चिततेच्या वातावरणात मागील तिमाहीतील 8% पेक्षा जास्त वाढ भारताच्या लवचिकतेचे आणि अंतर्निहित सामर्थ्याचे द्योतक आहे. पंतप्रधानांनी अधोरेखित केले की, भारत वेगाने आणि मोठ्या प्रमाणात जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स, कनेक्टिव्हिटी, विश्वासार्ह पुरवठा साखळी, उत्पादन क्षमता आणि हरित विकासावर काम करत आहे, जे "रोजगार आणि जीवनमान सुधारण्यास" तसेच "व्यवसाय सुलभतेला" चालना देईल". त्यांनी ओमानच्या व्यावसायिकांना ऊर्जा, तेल आणि वायू, पेट्रोकेमिकल्स आणि खते यांसारख्या पारंपरिक क्षेत्रांच्या पलीकडे पाहण्याचे आणि हरित ऊर्जा, सौर उद्याने, ऊर्जा संचयन, स्मार्ट ग्रिड्स, कृषी-तंत्रज्ञान, फिनटेक, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रांतील संधी शोधण्याचे आवाहन केले. व्यवसाय भागीदारीला भविष्यासाठी सज्ज करण्यासाठी त्यांनी भारत-ओमान कृषी नवोपक्रम केंद्र आणि भारत-ओमान नवोपक्रम सेतूच्या स्थापनेचा प्रस्ताव मांडला. या केवळ कल्पना नाहीत, तर गुंतवणुकीसाठी, नाविन्यपूर्ण शोधासाठी आणि एकत्रितपणे भविष्य घडवण्यासाठी आमंत्रण आहे, यावर पंतप्रधानांनी भर दिला.

4. पंतप्रधानांनी या कार्यक्रमात व्यापार क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींच्या प्रबळ उपस्थितीचे कौतुक केले आणि त्यांना उद्योगधंदा आणि धोरण यांचा संगम साधून CEPA ला गती देण्याचे आवाहन केले. भारत आणि ओमान हे केवळ जवळचे शेजारी नाहीत, तर प्रादेशिक तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थैर्य, विकास आणि सामायिक समृद्धीसाठी वचनबद्ध असलेले धोरणात्मक भागीदार आहेत, असा पुनरुच्चार त्यांनी केला. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल: [Link].

मस्कत

18 डिसेंबर 2025